वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## कृष्णा आंधळे इथे आहे, पैसे पाठवा घेऊन येतो

# आमदारासह खासदाराची फसवणूक

## साडेचार तास वाट पाहायला लावून सुरेश धसांकडून पाच हजार उकळले



Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com


# दिव्य वार्ता

**बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे वातावरण ढवळून निघालं आहे. या प्रकरणातील इतर आरोपींना अटक करण्यात आली असली तर कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे. पोलीस यंत्रणा त्याच्या शोधावर असून दोन महिन्यांपासून तो गायब आहे. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरलं असताना त्यांच्यासोबत फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. फरार कृष्णा आंधळेला घेऊन येतो म्हणत एकाने सुरेश धस यांची पाच हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. मस्साजोगच्या ग्रामस्थांशी संवाद साधत असताना सुरेश धस यांनी या प्रकाराबाबत माहिती दिली.**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही मागण्यांसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी दोन दिवस अन्नत्याग आंदोलन केले. पोलिसांच्या लेखी आश्वासनानंतर हे आंदोलन बुधवारी मागे घेण्यात आलं. यावेळी भाजपचे आमदार सुरेश धस हे देखील उपस्थित होते. गावकऱ्यांशी संवाद साधताना सुरेश धस यांनी फरार कृष्णा आंधळेच्या नावावर आपली फसवणूक झाल्याचे सांगितले. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा तीन महिन्यांपासून फरार असून अद्याप त्याचा शोध लागलेला नाही.

अशातच कृष्णा आंधळे याला घेऊन येतो असं सांगून एकाने सुरेश धस यांची पाच हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांचीही त्याच व्यक्तीने फसवणूक केल्याचं समोर आलं. बजरंग सोनवणे यांनाही या व्यक्तीने फोन करून कृष्णा आंधळे हा छत्रपती संभाजीनगरमध्ये असल्याचे सांगितले होते. मात्र नंतर

# वाल्मिक कराडसह ८ आरोपींविरोधात सीआयडी दाखल करणार चार्जशीट



बीड, (दिव्य न्युज):- बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाला आणखी वेग आला असून आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, यासाठी आता यंत्रणांकडून वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. सरपंच हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याच्यासह ८ आरोपींविरोधात सीआयडीकडून बीडमधील विशेष मकोका कोर्टात आरोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे समजते. तब्बल १४०० पानी आरोपपत्राच्या माध्यमातून आरोपींनी केलेल्या दुष्कृत्याचा लेखाजोखा सीआयडीकडून कोर्टासमोर मांडण्यात येणार आहे.

सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या प्रकरण्यात आली होती. त्यानंतर आरोपी फरार झाले होते. मात्र देशमुख कुटुंबियांसह राज्यभरातील जनतेच्या आक्रोशातून निर्माण झालेल्या दबावामुळे तपासाची चक्रे फिरली अन् काही आरोपी स्वत:हून हजर झाले तर पोलिसांकडून काहींच्या मुसक्या आवळण्यात आल्या. या आरोपींना कोर्टाच्या माध्यमातून कठोर शिक्षा होण्यासाठी यंत्रणांकडून सादर केले जाणारे आरोपपत्र महत्त्वाचे ठरणार आहे. आरोपींनी नेमकी कशा प्रकारे देशमुख यांची हत्या केली, कोणत्या आरोपीची काय भूमिका होती, त्याबाबतचे कोणते पुरावे तपास यंत्रणांकडे आहे, हे आरोपपत्राच्या माध्यमातून स्पष्ट होणार आहे.

ग्रामस्थांकडून १० दिवसांचा

### बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या कैदचे आदेश निघताच

# यंत्रणा खडबडून जागी, भरले १३ लाख



बीड, (दिव्य न्युज):- भूसंपादन मावेजाप्रकरणी बीडचे जिल्हाधिकारी आणि लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याला कैद करण्याचा आदेश बीडच्या दिवाणी न्यायाधीशांनी देताच शासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली. याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने १३ लाख १९ हजार रुपयांचा धनादेश दिवाणी न्यायालयाकडे मंगळवारी सुपूर्द केला.बीड येथील राजेश पोकळे यांची जमीन लघु पाटबंधारे विभागाने (स्थानिक स्तर) प्रकल्पासाठी संपादित केली होती. त्याचा मावेजा देण्याचा आदेश २०१८ मध्ये देण्यात आला होता. मात्र, त्याची पूर्तता अद्यापही झाली नव्हती. त्यामुळे १३ लाख १९ हजार रुपयांच्या मावेजासाठी

# मेंढपाळ करीत असलेल्या अल्पवयीन मुलीवर अज्ञात तरुणाचा अत्याचार

### साडेचार महिन्या पूर्वीची घटना



जिंतूर , (दिव्य न्युज):- विर्दभातील असलेल्या मेंढपाळ करणारी अल्पवयीन मुलीवर अनोळखी तरुणांनी अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे सदर मुलगी गरोदर असल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रकार उघडीस आला आहे या प्रकरणी विर्दभातील सेनगाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे मात्र ही घटना जिंतूर पोलीसस्टेशन हद्दीत येत असल्यामुळे सदर प्रकरणातील गुन्हा जिंतूर पोलीसठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहिती नुसार विर्दभातील एक अल्पयीन मुलगी तीच्या आई व वडील याच्या सोबत मेंढ्या चालविण्या साठी परभणी जिल्हात गेली होती सुमारे साडेचार महिन्यापूर्वी हे सर्वजण मेंढ्या घेवून जिंतूर ते येलदरी रोडवर आले होते यावेळी मुलीला तहान लागल्या मुळे रस्त्यापासून काही अंतरावर असलेल्या एका झोपडी मध्ये सदर मुलगी पाणी पिण्यासाठी गेली होती या वेळी एक तरुण त्या ठिकानी आला आणि त्याने मुलीवर

# महिला, मुली घरातच असुरक्षित

### ओळखीचे, जवळच्या नातेवाइकांपासूनच अधिक धोका

बीड , (दिव्य न्युज):- जिल्ह्यात महिला अन्याय, अत्याचारांच्या घटना थांबत नसल्याचे समोर आले आहे. २०२४ या वर्षात १७७ महिलांवर अत्याचार झाला आहे. तसेच, अल्पवयीन मुलीही या अत्याचाराच्या शिकार झाल्या आहेत. असे ४४५ गुन्हे पोलिस दप्तरी नोंद आहेत. विशेष म्हणजे अनोळखी लोकांपेक्षा ओळखीच्या लोकांच्याच महिला, मुली शिकार झाल्या आहेत. या सर्व प्रकरणांवरून महिला, मुली घरातच असुरक्षित असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आईसह घरातील ज्येष्ठांनी वारंवार लक्ष ठेवण्यासह संवाद साधण्याची गरज आहे. मी तुमचीच, तरीही माझ्यावर वाईट नजर का? असा सवाल आता महिलांमधून उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. खुनांसह जीवघेणे हल्ले, अपहरण आदी गंभीर गुन्ह्यांचा आलेख वाढत आहे. त्यातच मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणाने बीडचे नाव राज्यभर झाले. याच अनुषंगाने जिल्ह्यातील मुली, महिलांवरील

### दोन दिवसांना अत्याचार

महिला, मुलींवर जिल्ह्यात दर दोन दिवसांना अत्याचाराची घटना घडत आहे, तसेच दररोज एका महिला, मुलीची छेड काढून तिचा विनयभंग केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात महिला, मुली असुरक्षित असल्याचे दिसून येते.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

बहुतांश घटना या आमिष दाखवून झालेल्या आहेत. यात महिला, मुलींना लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला जातो. तसेच, चॉकलेटसह इतर आमिष दाखवून अल्पवयीन मुलींवर अत्याचार केला जातो.

# बीडमध्ये १३ महिन्यांत १० ठिकाणी अनधिकृत पुतळे

### रात्रीतूनच चौकाला नाव अन् पुतळ्याची उभारणी

बीड , (दिव्य न्युज):-महापुरुष, आदर्श व्यक्ती यांच्याबद्दल प्रत्येकाच्या मनात आदर असावा. त्यांच्या स्मृतींची आठवण राहावी, यासाठी पुतळे उभारले जातात; परंतु त्यासाठी प्रशासन आणि स्थानिक पातळीवरून परवानगी घेणे आवश्यक असते. मागील १३ महिन्यांत कोणीही असे केलेले नाही. उलट अनधिकृतपणे चौक, पुतळे उभा करून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. १० ठिकाणी असे प्रकार घडले होते. त्यातील सहा ठिकाणी गुन्हे दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे अशा संवेदनशील प्रकरणांत बांधकाम विभाग अथवा महसूल प्रशासनाच्या प्रतिनिधीने फिर्याद देणे आवश्यक असते; परंतु पोलिसांनीच पुढाकार घेतला.सामान्य प्रशासन विभागाने २ मे २०२७ रोजी शासन

# जातीयवाद संपविण्यासाठी पाऊल

### बीड पोलिसांना मिळेल फक्त पहिल्या नावाची नेमप्लेट!



बीड , (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील जातीयवाद संपविण्याआधी पोलिसांच्या मनातून 'जात' काढण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पहिल्या नावाने बोलण्याचा आदेश काढला. त्यानंतर आणखी एक पाऊल पुढे टाकत कार्यालयीन व प्रत्येक ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या टेबलवर आता पहिल्या नावाची पाटी लागणार आहे. त्यामुळे सामान्य लोकही पहिल्या नावाने बोलतील आणि कोणाचीही 'जात' समजणार नाही. यातून सलोखा वाढणार आहे.

लोकसभा निवडणुकीपासून जिल्ह्यात जातीयवाद वाढला आहे. विधानसभेत तो आणखी बळकट झाला. सध्या तर पोलिस दलातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांवरही 'जाती'चे आरोप होत आहेत. असे असतानाच ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली आणि पोलिस अधीक्षक बदलले. २१ डिसेंबर २०२४ रोजी नवनीत काँवत यांची बीडला नियुक्ती झाली. त्यांनी आगोदर पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांना पहिल्या नावाने बोलण्यासंदर्भात आदेश काढून आवाहन केले. याला यशही आले. त्यानंतर आता त्यांनी प्रत्येक पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या टेबलवर केवळ पहिल्या नावाची नेमप्लेट

# ॲड.उषाताई दराडे यांच्याकडून निवड झालेल्या पत्रकारांचा सन्मान

### बालाजी तोंडे, शेख रिजवान, दिपक जाधव, प्रशांत लव्हुरीकर आणि अबूबकर सन्मानित





बीड , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी आमदार ॲड. उषाताई दराडे यांनी पत्रकारांच्या निवडीबद्दल आणि वर्धापन दिनानिमित्त संपादक यांना आपल्या निवासस्थानी शाल पुष्पगुच्छ देऊन कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देत ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मोतीराम दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूर कर यांनी पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दैनिक समर्थ लोकनेताचे संपादक बालाजी तोंडे आणि दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान तसेच डिजिटल मीडियाच्या











पान ४ वरून

## गावाचा झाला उखंडा,

सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत . त्यामुळे गावात काय चालले आहे , काय समस्या आहेत याकडे लक्ष देण्यास राजकारण्यांना वेळ मिळत नाही . गावामध्ये मागील महिन्यात घरापासून कचरा न उचलल्या गेल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून येथील आठवडे बाजार तळावर सुद्धा हीच स्थिती आहे . कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली असून बाजार करुना आहे त्या परिस्थितीतच बाजार तळावर थांबावे लागते . ग्रामपंचायत गावातील कचरा उचलून बाजार तळावर टाकते पण मागील काही दिवसात कचरा उचलला गेला नाही . कचरा उचलल्यानंतर किंवा ज्या ठिकाणी कचरा आहे त्या ठिकाणी कचरा पेटवून दिला जातो त्यामुळे एक तर कचऱ्याचे प्रदूषण व दुसरे कचरा जाळल्यामुळे होणारे हवेचे प्रदूषण असा कचऱ्याविषयी ग्रामपंचायत डबल धमाका सुरू आहे . बाजार तळावर ज्या ठिकाणी कचरा जाळला जातो त्या ठिकाणी दवाखाना व मंदीरे आजूबाजूला घर असून त्यामुळे लोकांना श्वास घेण्यास त्रास होतो . कचऱ्याच्या व घाणीच्या या गंभीर प्रश्नावर सर्वच राजकारणी एकत्र येऊन नागरिकांना दिलासा देण्याचे काम करणे अपेक्षित आहे . त्यामुळे राजकारण करणारे सर्वच पक्षांचे राजकारणी पुढारी गावातील नागरिकांच्या समस्येकडे लक्ष देतील का असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे .

## नेकनूर पोलिसांनी

केज मार्ग बीड जिल्ह्यात कार (एम.एच.२२, ए.एम.३४४६) ने येत होते. याची माहिती नेकनूर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी सापळा रचून आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र दोन्ही आरोपींनी पोलिसांना पाहताच गाडीतून पळ काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्यांच्या गाडीला पोलिसांच्या गाड्या थोड्याच अंतरावर गेल्यानंतर आडव्या लावण्यात आल्यामुळे त्यांना पकडण्यात यश आले. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, सचिन वंजारे, बाळासाहेब ठाकणे, अब्दुल सय्यद, मुन्नतजीब अत्तार यांनी केली.

## रमज़ान निमित्ताने काढण्यात

रमज़ान महिन्यात नळांना एवढ्या दिवसात पाणी सोडा, विद्युत पुरवठा खंडित करू नका, नाल्यांची स्वच्छता करा, कचरा वेळेवर उचला, रस्त्यांवर झाडू मारा, शहराला गलिच्छतेपासून मुक्त करा, रस्त्यांचे खड्डे बुजवा असे एक ना अनेक प्रश्न व समस्यांचा उहापोह पत्रकातून करतात. यातील काही प्रश्न हे नगर परिषदेच्या तर काही महावितरण कंपनीशी निगडित असतात. रमजान निमित्ताने करण्यात येणारी पत्रकबाजी सुरू झाली की मग अनियमित पाणीपुरवठा सुरू होतो. वारंवार वीज खंडित होते. तीही खास करून पहाटे सहरीच्या वेळी आणि संध्याकाळी रोजा सोडण्याच्या वेळी. नाल्यांची स्वच्छता वेळीच करण्यात येत नाही. कचरा वेळेवर उचलला जात नाही. रस्त्यांवर झाडू मारले जात नाही. रस्त्यांचे खड्डे बुजविणे तर दुर त्यांकडे पाहिले सुद्धा जात नाही. पर्यायाने शहरातली गलिच्छता वाढत जाते. हा क्रम गेल्या अनेक वर्षांपासून अनुभवयास मिळत आहे. म्हणून रमज़ान निमित्ताने काढण्यात येणाऱ्या अशा पत्रकांमुळे फक्त इस्लाम धर्मीय मुसलमानच नाही तर इतर धर्मीयांना सुद्धा बीड नगर परिषद तसेच महावितरण कंपनीकडून मिळणाऱ्या सेवांमध्ये गडबड होते. याचा त्रास फक्त मुसलमानच नाही तर इतर धर्मीयांना सुद्धा होतो. यामुळे अशी पत्रके काढण्याऐवजी जिथे कुठे ज्या काही समस्या असतील त्या पुढे येऊन संबंधित विभागाकडून सुरळीत करून घेण्याचा प्रयत्न करावा असे आवाहनही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## प्रतिबंधित ड्रगसवर परभणी

अंमलदारांनी सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले असता त्याचे ताब्यातून ५ हजार २२ रूपये किंमतीच्या टरमाईन इंजेक्शन असे लेबल असलेल्या काचेच्या १० चङ च्या एकुण १५ बॉटल मिळून आल्यावरून त्याच्याविरुद्ध नानलपेठ पोलीस ठाण्यात कलम २१०,२७८,१२५ भा.न्या.सं सहकलम ३, ७ जीवनावश्यक वस्तू अधिनियम१९५५ केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक श्री.यशवंत काळे यांच्या नेतृत्वात पोउपनि ढेमकेवाड व सोबतचे अंमलदार कोळेकर, जाधव, तेजनकर, बांगर, करकले यांनी मिळून केली. ह्या इंजेक्शन वापर -जिम ( व्यायमशाळा) मधील कसरत करणाऱ्या तरुणाला त्याचे शरीर सुडोल करण्यासाठी वापर केला जात होता परंतू शासनाने या इंजेक्शन वर प्रतिबंध लावलेले आहे म्हणून ही कार्यवाही करण्यात आली आहे.

## आदर्श सरपंच भरत

नाईकवडी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी मा.आ.सिराज देशमुख, मा.आ.राजेंद्र जगताप,शफीक भाऊ, भाजपा अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष मा.सलीम जहांगीर, यशराज पंडित,दैनिक दिव्या वार्ता/साप्ता.कश्मकश चे संपादक अबुबकर चाऊस, लोकशा संपादक विजय बंब , लोकप्रभा संपादक संतोष मानुरकर, दैनिक वास्तव संपादक जितेंद्र सिरसाठ, सिटीजन कार्यकारी कार्यकारी संपादक चंदन पठाण लोकमित्रचे संपादक हमीदखान पठाण,जावेद शेख, बाळासाहेब कोहक सर,प्रदीप बांगर, गफार पटेल, पिंटू गव्हाणे,सोमीनाथ कोल्हे, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त मान्यवरांवर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरून

## आमदारासह खासदार

हा फसवणुकीचा प्रकार असल्याचे समोर आले.

बापूराव बारगजे या व्यक्तीचा मलासुद्धा फोन आला होता. तो मला म्हणाला की कृष्णा आंधळे इथे आहे. त्याला कॅबमध्ये बसवून आणायचे आहेत पैसे पाठवा. मी त्याला पाच हजार रुपये पाठवले. मला त्याने साडेचार तास नगरला उभे केले. हॉनगरमधल्या हॉटेल यश पॅलेसला मी साडेचार तास वाट बघत बसलो पण तो आला नाही. त्याला पकडावं यासाठी मी आष्टीच्या पोलिसांना सोबत नेलं होतं. तो बारगजे नावाचा माणूस फ्रॉड निघाला. दोन-पाच रुपये कमावणाऱ्या या औलादी आहेत. मी पोलीस अधिक्षकांना फोन करुन याची माहिती दिली. अशा घटनांमधून दोन पाच रुपये कमावणाऱ्या व्यक्तीसुद्धा असू शकतात, असं सुरेश धस म्हणाले.

## वाल्मीक कराडसह

अल्टिमेटम

संतोष देशमुख हत्या प्रकरणी ९ मागण्या प्रशासनाने मान्य कराव्यात, यासाठी मंगळवारपासून देशमुख कुटुंबीय व ग्रामस्थांनी सामूहिक अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. बुधवारी दुपारी पोलिस अधीक्षक नवनीत कॉँवत यांच्या लेखी आश्वासनाचे पत्र अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते मिळाल्यानंतर बुधवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान हे आंदोलन मागे घेण्यात आले; परंतु त्यासाठी आणखी १० दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम

सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. बाळासाहेब कोल्हे हे सहायक विशेष सरकारी वकील असतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करून ही माहिती दिली. देशमुख कुटुंब व ग्रामस्थांची मागणी सरकारने मागणी मान्य केली.

## यंत्रणा खडबडून जागी,

शासनाच्यावतीने बीडचे जिल्हाधिकारी आणि लघु पाटबंधारे विभाग स्थानिक स्तरचे कार्यकारी अभियंता यांना कैद करावे तसेच त्यांच्याकडून मावेजाची रक्कम भरणा करून घ्यावी, अशा आदेशाचे वॉरंट बीडच्या दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. एस. पिंगळे यांच्या न्यायालयाने काढले आहेत.

या वॉरंटची अंमलबजावणी २१ मार्चपूर्वी करावयाची असल्याचे सूचना केली होती. त्यानंतर संबंधित प्रकरणाची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घेतली तसेच पाटोदा उपविभागीय अधिकारी यांच्या सहीचा १३ लाख १९ हजार रुपयांचा धनादेश दिवाणी न्यायालयाकडे सुपूर्द करण्यात आला. त्यामुळे जिल्हाधिकारी व लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची अटक टळली आहे.

## महिला, मुली

अन्याय, अत्याचाराची आकडेवारी घेतली असता धक्कादायक माहिती समोर आली. अत्याचार, विनयभंग करणारे लोक हे बाहेरचे कमी आणि घरातले, नातेवाईक, ओळखीतलेच जास्त असल्याचे समोर आले. त्यामुळे विश्वास ठेवायचा कोणावर? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

या घटना नात्याला काळिमा

धारूर पोलिस ठाणे हद्दीत जवळच्या नातेवाईकानेच मुलीवर अत्याचार केला होता. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर हे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर पाटोदा पोलिस ठाणे हद्दीतही जवळच्यानेच मुलीवर अत्याचार केला होता. अशाच नात्यातील इतर लोकांनीही महिला, अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत.

## मेंढपाळ करीत असलेल्या

अत्याचार केला व घटनास्थळापासून पळ काढला अचानक झालेल्या या प्रकारा मुळे मुलगी घाबरून गेली तीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही त्यानंतर दोनदिवसा पुर्वीच त्या मुलीच्या पोटात वेदना होत असल्याने तीला उपचारासाठी रिसोड येथील रुग्णालयात नेण्यात आले त्याठिकाणी डॉक्टरांनी तपासणी केली असता ती गरोदर असल्याचे निष्पण झाले सदर प्रकरण डॉक्टरांनी रिसोडच्या पोलीसाना कळविला रिसोडच्या पोलीसांनी सदर घटनाही जिंतूर पोलीस हद्दीत येत असल्याने हा गुन्हा जिंतूर पोलीस स्टेशन कडे वर्ग केला आहे व दिनांक २२ फेब्रुवारी२०२५ रोजी सदर गुन्हा जिंतूर पोलीस ठाणे येथे वर्ग झाला असून जिंतूरचे पोलीस पुढील तपास करीत आहे असे आमचे प्रतिनिधी यांनी कळविले आहे

## जातीयवाद संपविण्यासाठी

देण्याचा निर्णय घेतला आहे. १ मार्च पासून याची अंमलबजावणी होणार आहे.

काय आहे संकल्पना ?

आडनावाने बोलल्याने अनेकांची जात लक्षात येते. हे न समजता सलोखा राहावा, यासाठी पहिल्या नावाने बोलण्याची संकल्पना हाती घेतली. याला यश आल्यानंतर आता प्रत्येक पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांसह बीट अंमलदारांना पहिल्या नावाची नेमप्लेट पोलिस दलाकडून दिली जाणार आहे. हे नाव निळ्या रंगात राहणार असून नावाच्या बाजूला 'महाराष्ट्र पोलिस' असा लोगो असेल. अभिमान वाटावा आणि काम करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी हे केले जाणार आहे.

अंमलदारांना पेन, पेपरही मिळणार

पोलिस ठाण्यात काम करणारे अंमलदार हे स्वखर्चातून पेन, पेपर खरेदी करतात. परंतु, शासकीय काम असल्याने त्यांना हा भुर्दंड बसू नये, यासाठी पेन, पेपरसह इतर स्टेशनरी दिली जाणार आहे. त्याची खरेदीही करण्यात आली आहे.

आदेश काढला आहे

मी स्वत: सर्वांना पहिल्या नावाने बोलतो. तसेच, इतरांनीही बोलण्यासंदर्भात आदेश काढला आहे. आता प्रत्येक बीट अंमलदार यांना त्यांच्या टेबलवर ठेवण्यासाठी पहिल्या नावाची नेमप्लेट देत आहोत. त्याखाली महाराष्ट्र पोलिस असे लिहिलेले असेल.

– नवनीत कॉँवत, पोलिस अधीक्षक, बीड

## ॲड.उषाताई दराडे यांच्याकडून

बीड जिल्हाध्यक्ष पदी दिपक जाधव आणि बीड जिल्हा उपाध्यक्षपदी ब्रम्हवृंदचे संपादक प्रशांत लव्हुरीकर यांची निवड झाल्याबद्दल तर दैनिक दिव्य वार्ताचे संपादक अबू बकर हे आपल्या वर्धापन दिनानिमित्त सातत्याने सामाजिक उपक्रमातून गरजवंतांना सहकार्य करत असल्याने या सर्वांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या माजी आमदार अँड उषाताई दराडे यांनी आपल्या निवासस्थानी शाल पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ अँड मोतीराम दराडे यांची विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोग संपादक वैभव स्वामी यांच्यासह राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या मंगल जगताप, राणी शेख, किरण जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## बीडमध्ये १३ महिन्यांत

निर्णय काढून पुतळा धोरण ठरवले. यात महापुरुष, आदर्श व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविली. पुतळ्याच्या परवानगीसाठी आलेले प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित राहात असल्याने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक पातळीवर समिती तयार केली. यात सर्व कागदपत्रे घेऊन परवानगी देण्यास सांगितले; परंतु जिल्ह्यात असे कोणीही करताना दिसत नाही. रात्रीतूनच पुतळा उभारायचा किंवा चौकाला नाव द्यायचे, असे प्रकार मागील काही दिवसांपासून सुरू आहेत. त्यामुळे दोन समाजात, गटात वाद होत आहेत. तसेच अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने अशा घटना टाळण्यासाठी असे प्रकार कोणीही करणार नाही, यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे. तसेच ज्यांनी असे केले आहे, त्यांच्याविरोधात तक्रार देणेही तितकेचे गरजेचे आहे.

गाव किंवा शहरी भागात उभारलेले पुतळे हे सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा ग्रामसेवक, तलाठी यांच्या अखत्यारित येतात. जागेचे मालक हेच विभाग असतात. त्यामुळे त्यांच्या जागेत असे अनधिकृत पुतळे उभारल्यास महसूल अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाने फिर्यादी होऊन गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे; परंतु असे करण्यास हे विभाग आखडता हात घेतात. जरी तक्रार दिली तरी अज्ञात लोक, असे सांगतात. वादात पडायचे नको? या हेतून मोगम तक्रार दिली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.

१० पैकी सहा गुन्हे दाखल

२०२४ व जानेवारी २०२५ या काळात जिल्ह्यात १० ठिकाणी अनधिकृत पुतळे उभारण्यात आले. यामध्ये चार प्रकरणांत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असल्याने पोलिसांनीच फिर्याद दिली, तर बांधकाम विभाग व ग्रामसेवकांनी दोन प्रकरणांत फिर्याद दिली चार ठिकाणी, तर तक्रार देण्यासही कोणी आले नाही.

समितीत कोण असते?

शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतात. पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता हे सदस्य असतात. निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असतात.

पुतळा उभारण्यासाठी २१ सूचना

पुतळा उभारण्यासाठी शासनाने समितीला २१ मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. कायदा व सुव्यवस्था, शपथपत्र, परवागनी, ना-हरकत आदींचा यात समावेश आहे. २ मे २०१७ च्या शासन निर्णयात याचा स्पष्ट उल्लेख आहे.